लातूर
# भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : सोमवार - २४ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - ११६
पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com







## त्यांच्या मते....

▣ **जेंव्हा राज्यपालापुढे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे नाव गेले तेंव्हा त्यांना शॉक बसला होता.**

- देवेंद्र फडणवीस

दुसरा शॉक कधी बसला हे एकनाथ शिंदे यांना कळणारही नाही.

▣ **एनडीआरएफ पथकाकडून सुरू असलेली शोध मोहिम आता थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

- एक बातमी

गाढले गेलेले आदिवासी बेपत्ताच का?

▣ **देशात सर्वाधीक कमाई करणाऱ्यांमध्ये 'डॉक्टर्स' प्रथमस्थानी**

- एक बातमी

राजकाण्यांच्या नावाने उगिच 'खडी' का फोडली जात आहे.

▣ **महाराष्ट्राच्या प्रगतीसाठीची एकनाथ शिंदे यांची तळमळ आणि त्यांचा विनम्र स्वभाव कौतुकास्पद**

- मोदी यांचे ट्वीट

अजित पवार यांनाही एकदा 'सहकुटुंब' दिल्लीत बोलावून त्यांचेही कौतुक होणारच!



# लातूर जिल्हा प्रशासन महिलांच्या हाती

लातूर : लातूर जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच लातूर जिल्ह्याला महिला जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर-घुगे यांच्या निमित्ताने लाभल्या आहेत. तसे लातूर जिल्ह्याचे प्रशासनात प्रमुख पदावर महिला-अधिकारी असल्याने लातूर जिल्ह्याच्या प्रशासनाची 'दोरी' महिला-भगिनीच्या हाती आली आहे.

लातूरच्या जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर-घुगे, लातूर उपविभागीय महसूल अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे, विरोळे, निलंगा उपविभागीय महसूल अधिकारी सौ. शोभा जाधव, सौ. अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी रोहयो, डॉ. सुचित ढगे-उपजिल्हा निवडणूक अधिकारी, प्रियंका कांबळे- जिल्हा पुरवठा अधिकारी सौ. शोभा पुजारी-तहसीलदार लातूर, उषाकिरण शृंगारे तहसीलदार निलंगा, सौ. स्वामी तहसीलदार जळकोट, धम्मप्रिया गायकवाड तहसीलदार रेणापूर, तसेच जिल्हा कृषी अधीक्षक रक्षा शिंदे या प्रमाणे महिला अधिकारी लातूर जिल्ह्याच्या महत्वाच्या अशा प्रशासकीय पदावर आहेत.

तसेच लातूर जिल्ह्याच्या मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधिशपदी श्रीमती कोसमकर, उपजिल्हधिकारी भूसंपादन (समन्वय) श्रीमती संगीता टकले, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार रोहिणी मोरे, उपसंचालक माहिती व जनसंपर्क सुरेखा मुळे, भूमी अभिलेख अधीक्षक सौ. देशमुख या आहेत. तलाठी, ग्रामसेविका, कृषी सहाय्यक या पदावर मोठ्या प्रमाणात महिला भगिनी कार्यरत आहेत.

# लातुरात माजी सैनिकाची डोक्यात गोळ्या झाडून आत्महत्या



लातूर : लातूर शहरातील विक्रमनगर पिल्ले निवास जवळ, नवभारत शाळेच्या समोर दोन खोल्याच्या भाड्याच्या घरात राहणाऱ्या माजी सैनिकाने आज सकाळी डोक्यात पिस्टलमधून गोळ्या झाडून आत्महत्या केली आहे.

सुशिल वैजनाथ कावळे (४२) रा. चिंचोली (ब.) ता. लातूर हे नवभारत शाळेसमोर दोन खोल्यामध्ये भाड्याने राहत होते. दोन वर्षापूर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून ते लातुरात राहत होते. आज सोमवार सकाळी पावणेदहा वाजण्याच्या सुमारास सुशिल कांबळे यांनी स्वतः जवळील पिस्टलमधून डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली. त्यावेळी त्यांची पत्नी स्वयंपाक घरात होती. माजी सैनिकाने आत्महत्या का केली याचे कारण स्पष्ट झाले नसले तरी कुटुंबातील किरकोळ याचे कारण स्पष्ट झाले नसले तरी कुटुंबातील किरकोळ कारणावरून हि आत्महत्या केली असण्याची शक्यता आहे. सुशिल कांबळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई, वडिल, एक भाऊ असा परिवार आहे. घटनेचे वृत्त कळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे अधिकारी-कर्मचरी यांनी घटनास्थळास भेट दिली. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रूग्णालयात पाठविण्यात आले आहे.

# तिसऱ्या दिवशीही लोकसभेत मणिपूर हिंसाचाराचे पडसाद; गोंधळानंतर कामकाज सुरू



नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्याला सुरुवात झाली असून, सकाळी ९.३० वाजता सुरु झालेल्या लोकसभेच्या कामकाजात आज तिसऱ्या दिवशीही विरोधकांनी सरकारला मणिपूर हिंसाचारावरून धारेवर धरले. काही काळ कामकाज स्थगित करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर आता कामकाज गोंधळातच सुरू करण्यात आले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. आज सुद्धा संसदेच्या दोन्ही सभागृहात मणिपूरच्या मुद्यावर गोंधळ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती आणि झालेही तसेच. राजस्थान, पश्रि्चम बंगला आणि छत्तीसगडमध्ये महिलांवर होत असलेल्या अत्याचारा विरोधात आंदोलन केले. तर इंडिया आघाडीचे नेते राज्यसभा विरोधी पक्ष नेत्याच्या दालनात बैठक करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# औसा-तुळजापूर महामार्गावर मनोरूग्णाने कोथळा काढला

औसा : औसा-तुळजापूर महामार्गावर एका मनोरूग्णाने बोरफळ शिवारात चारचाकीमधून जाणाऱ्या एका व्यक्तीच्या पोटात दोन वेळा विळा खूपसून आतडे बाहेर काढल्याची घटना २२ रोजी दुपारी ४.३० वा. दरम्यान घडली असून या प्रकरणी एकाच्या विरोधात औसा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पियूष राजाभाऊ कश्यप रा. पाखरसांगवी हे सर्व्हेअर व त्याचा मित्र संतोष कानमोडे हे दोघे शिवली येथे जेवण करून चारचाकीमधून लातूरकडे जात असताना त्यांच्या कारवर एचपी पेट्रोल पंपासमोर एकाने गाडीवर काठी उगारली. तेंव्हा कारचालक व त्यांच्या मित्राने गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून काठी का उगारली अशी विचारणा केली असता. नेताजी विश्वास मांजरे रा. बोरफळ ता. औसा या मनोरूग्णाने आपल्या हातातील विळा संतोष कानडे यांच्या पोटात खुपसला, लागलीच दुसऱ्यांदा विळा खूपसला व त्याच्या पोटाचा कोथळा बाहेर काढला, दरम्यान कानमोडे हा खाली कोसळला, त्यानंतर पियूष कश्यप याने आरडाओरड करताच मांजरे पळून गेला. या प्रकरणी औसा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लोंढ हे अधिक तपास करित आहेत.

# ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचे निधन

मुंबई : ज्येष्ठ अभिनेते आणि रंगकर्मी जयंत सावरकर यांचे निधन झाले आहे. वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शंभराहून अधिक मराठी नाटकांमध्ये आणि ३० हून अधिक हिंदी सिनेमांत त्यांनी अजरामर भूमिका साकारल्या आहेत.

जयंत सावरकर यांच्या निधनानंतर चाहत्यांसह मराठी मनोरंजनसृष्टीतील सेलिब्रिटी शोक व्यक्त करत आहेत. गेल्या चार दशकांपासून त्यांनी प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. जयंत सावरकर हे ९७ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते. जयंत सावरकर हे रंगकर्मी असण्यासोबत मालिका, सिनेमे आणि वेबसीरिजमध्येही ते झळकले आहेत.

जयंत सावरकर यांच्या निधनानंतर एबीपी माझासोबत बोलताना जयवंत वाडकर म्हणाले की,गेल्या १५ दिवसांपासून जयंत सावरकर यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावली. त्यानंतर त्यांना व्हेटिंलेटरवर ठेवण्यात आले. पण नंतर काही वेळातच त्यांचं निधन झालं. जयंत सावरकर यांच्या पार्थिवावर उद्या २५ जुलै रोजी अंत्यसंस्कार होणार आहेत.



जयंत सावरकर यांचा जन्म ३ मे १९३६ रोजी गुहागर येथे झाला. वयाच्या विसाव्या वर्षी जयंत सावरकर यांनी मनोरंजनसृष्टीत पाऊल ठेवलं. त्यांची अनेक नाटके गाजली आहेत. 'अपराध मीच केला' (गोळे मास्तर), 'अपूर्णांक', 'अलीबाबा चाळीस चोर', 'अल्लादीन जादूचा दिवा', 'आम्ही जगतो बेफाम', 'एकच प्याला' अशी अनेक नाटके त्यांची गाजली आहेत. 'एकच प्याला' नाटकातील त्यांची तळीरामांची भूमिका चांगलीच गाजली आहे. विनोदीसह गंभीर भूमिकांच्या माध्यमातून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. काही महिन्यांपूर्वीच 'आई कुठे काय करते' या छोट्या पडद्यावरील मालिकेत ते दिसले होते. 'समांतर' या वेबसीरिजमध्येही त्यांनी काम केलं आहे.

नाटकांबरोबरच जयंत सावरकर यांनी चित्रपटांमध्ये देखील काम केलं होतं. येड्यांची जत्रा,बिस्कीट,विघ्नहर्ता महागणपती, हरिओम विठ्ठला, पोलीस लाईन या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केलं. तसेच सिंघम, वास्तव : द रिलिटी, बडे दिलवाला, सिंघम या हिंदी चित्रपटांमध्ये देखील त्यांनी महत्वाची भूमिका साकारली. अजय देवगण, इरफान खान, जॉन अब्राहम यांसारख्या तरुण कलाकारांबरोबर त्यांना कामे करायला मिळाली आहेत.




# जुन्या इमारती वापरास प्रतिबंध

लातूर शहरातील सूळ गल्ली, लाड गल्ली, जैन गल्ली, राम गल्ली, माळे गल्ली, तिवारी बोळ आदी परिसरात असलेले जुने वाडे, इमारती कोणत्याही क्षणी पडायला झालेल्या आहेत. अशा जीर्ण व धोकादायक इमारती वापरास प्रतिबंध करण्यात आले असल्याच्या नोटीसा त्या त्या इमारतीवर डकविण्यात आल्या आहेत. क्षेत्रीय अधिकारी बंडु किसवे, स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, हिरा कांबळे, देवेंद्र कांबळे, कर्मचारी यांनी या नोटीसा जीर्ण व पडायला झालेल्या इमारतीवर डकविल्या आहेत.

# तोडफोड करणं राजकारण्यांना शोभत नाही-शिरसाट

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे मागील ४ दिवसांपासून उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्याच्या दौर्यावर होते. दौर्याचा शेवटचा टप्पा असलेल्या भुसावळ येथील कार्यक्रम आटोपून अमित ठाकरे शनिवारी रात्री मुंबईच्या दिशेने रवाना झाले. यावेळी समृद्धी महामार्गाने प्रवास करत असताना सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथील टोलनाक्यावरील कर्मचार्यांनी अमित ठाकरेंसोबत गैरवर्तन केल्याचे म्हटले जात आहे. यानंतर मनसे नाशिक शहर अध्यक्ष दिलीप दातीर यांच्यासह कार्यकर्त्यांनी या टोलनाक्याची रविवारी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास तोडफोड केली. याप्रकरणी सिन्नर पोलिसांनी १५ ते १६ मनसे कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान, तोडफोड करणं राजकारण्यांना शोभत नाही, अशी टीका शिंदे गटाचे नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी अमित ठाकरे यांच्यावर केली आहे.

विधिमंडळाच्या प्रांगणात संजय शिरसाट यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, जेव्हा तुम्ही टोलनाक्यावर जातात. तेव्हा तुम्ही तुमची ओळख दाखवा किंवा आपलं आयडी कार्ड दाखवणं बंधनकारक आहे. मी सुद्धा एक आमदार आहे. उद्या जर मी सुद्धा अशाच प्रकारची मारहाण केली तर ते उचित ठरत नाही. सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान करणं हे राजकारण्यांना शोभत नाही. पण यावर सरकार योग्य ती कार्यवाही करेल, असं संजय शिरसाट म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मोदींना भेटायला गेले होते. त्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारची राजकीय घडामोड झालेली नाही. हे सर्व कयास विरोधक लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे २०२४ पर्यंत मुख्यमंत्रीपदी कायम राहणार आहेत, असंही शिरसाट म्हणाले.

# माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना हृदयविकाराचा झटका

नवी दिल्ली: माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना दिल्लीच्या आरएमएल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जाधव हे दिल्लीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी असताना त्यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. जाधव यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. जाधव यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान तब्येत ठीक नसल्याची माहिती व्हिडिओ तयार करून स्टेटसला ठेवून दिली आहे

कन्नड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार असलेले हर्षवर्धन जाधव हे केल्या काही दिवासांपासून विविध पक्षांच्या संपर्कात असल्याने चर्चेत होते. गेल्या काही दिवसांपासून भारत राष्ट्र समिती पक्षाने महाराष्ट्रातील राजकारणात प्रवेश केला आहे. मार्च महिन्यात त्यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत बीआरएस पक्षात प्रवेश केला.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील बीआरएसचे नेते माजी आमदार हर्षवर्धन जाधव हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी हर्षवर्धन जाधव असताना त्यांना त्या ठिकाणी हृदयविकाराचा सौम्य झटका आला दरम्यान त्यांना तात्काळ दिल्ली येथील आर एम एल रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आला आहे त्यांच्यावरती रुग्णालयावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती हर्षवर्धन जाधव यांनी विडिओ माध्यमातून दिली आहे.

केला. शिवसेनेची साथ सोडल्यानंतर त्यांनी स्वत:चा शिवस्वराज्य बहुजन पक्ष स्थापन केला होता. गेल्या म्हणजे २०१९च्या लोकसभा निवडणुकीत ते अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते. मात्र निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता.नुकताच त्यांनी बी आर एस पक्षात प्रवेश केला आहे.

# दर मिनिटाला शेअर करत आहात मुलांचे फोटो-रील, असू शकतो सायबर बुलिंगचा धोका

आजकाल प्रत्येकजण सोशल मीडियावर सक्रिय असतो. आयुष्यात जे काही चालले आहे, त्याच्याशी संबंधित गोष्टी आपण इन्स्टाग्राम, फेसबुक सारख्या प्लॅटफॉर्मवर शेअर करतो. मुलेही आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग आहेत आणि त्यांचा खोडकरपणा पाहून एक वेगळाच दिलासा मिळतो. अशा सुंदर क्षणांची जपणूक करण्यासाठी अनेक वेळा पालक आपल्या मुलांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करतात. अशी सामग्री वापरकर्त्यांना खूप आवडते. पण मुलांचे फोटो किंवा व्हिडिओ ऑनलाइन शेअर करणे सुरक्षित आहे का?

बालपण ही अशी अवस्था असते, जेव्हा मुले शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मोठी होत असतात. ते गोष्टी समजून घेण्याची आणि स्वतःशी जोडण्याची समज विकसित करतात. अशा वेळी, त्यांचे फोटो किंवा रील शेअर केल्याने त्यांच्या गोपनीयतेवर आणि वागणुकीवर परिणाम होऊ शकतो. मुलांशी संबंधित चुकीचा मजकूर पोस्ट करणे इंटरनेटच्या जगात धोकादायक ठरू शकते.




पालकांनी मुलांचे फोटो किंवा व्हिडिओ शेअर करताना काळजी घेणे आवश्यक आहे. त्यांचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केल्याने त्यांच्या भविष्यावरही चुकीचा परिणाम होऊ शकतो. चला काही धोक्यांबद्दल जाणून घेऊया.

मुलांचे भविष्य: इंटरनेटवर काहीही पोस्ट केल्यानंतर, ते काढून टाकणे खूप कठीण आहे. लोक ऑनलाइन शेअर केलेल्या गोष्टींचे स्क्रीनशॉट घेतात. मुलांचा कोणताही फोटो किंवा व्हिडीओ शेअर करताना विचार करा की त्यांचे मूल मोठे झाल्यावर या फोटो-व्हिडिओचा त्याच्यावर किती परिणाम होऊ शकतो. याचा मुलाच्या भविष्यावर तर विपरीत परिणाम होणार नाही ना?

इंटरनेटवर चुकीच्या ठिकाणी व्हायरल होणे: तुमच्या मुलाचे ऑनलाइन अपहरणही होऊ शकते. हे खरोखर अपहरण करण्यासारखे नाही, फक्त मुलाचा फोटो आणि व्हिडिओ दुसऱ्या नावाने आणि ओळखीसह वापरला जाऊ शकतो. अनेक वेळा असे देखील घडते, जेव्हा काही ऑनलाइन लोक दुसऱ्याच्या मुलांना त्यांची मुले म्हणून सांगण्याचा दावा करतात.

सायबर गुंडगिरी: मुलांचे फोटो ऑनलाइन शेअर करणे हा मोठा धोका आहे. मुलांना थेट सायबर गुंडगिरीचा सामना करावा लागतो, त्यामुळे त्याचा परिणामही मोठा आहे. फोटो किंवा व्हिडिओ पाहून मुलांची छेड काढली जाते. कुरूप टिप्पण्या ऑनलाइन केल्या जातात. या सर्व गोष्टींपासून मुलांना दूर ठेवणे खूप गरजेचे आहे. अश्लील सामग्री / पेडोफाइल्स: काही लोक चुकीच्या पद्धतीने सोशल मीडियावर शेअर केलेल्या प्रतिमांचा फायदा घेतात. या पीडोफाइलना चाइल्ड पोर्नोग्राफीचे वेड असते. असे लोक लहान मुलांचे फोटो आणि व्हिडिओ एडिट करून आक्षेपार्ह वेबसाइट किंवा फोरमवर पोस्ट करतात.

आपल्या मुलांचे फोटो आणि व्हिडिओ इन्स्टाग्राम किंवा फेसबुकवर शेअर करताना काळजी घेण्याची गरज आहे. ऑनलाइन धोके पाहता मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर करताना नेहमी सतर्क राहा.

# रेटिंग आणि रिव्ह्यूच्या भरवशावर करत आहात का ऑनलाइन शॉपिंग? अशाप्रकारे होत आहे फसवणूक




जेव्हाही तुम्ही ऑनलाइन शॉपिंग करता तेव्हा सर्वप्रथम त्या उत्पादनाचे रिव्ह्यू आणि रेटिंग तपासता, मगच तुम्ही त्यांच्यावर विश्र्वास ठेवता आणि खरेदी करता. पण जर आम्ही म्हटलो की हे रिव्ह्यू-रेटिंग खोटे असू शकतात, तर तुमचा यावर विश्र्वास बसणार नाही. वास्तविक, हे खरे आहे की कोणतीही वस्तू ऑनलाइन खरेदी करण्यापूर्वी, त्याचे रेटिंग आणि रिव्ह्यू तपासणे खूप महत्वाचे आहे, परंतु हे अधिक महत्त्वाचे आहे की हे रिव्ह्यू खरे आहे की ते स्वयं-जनरेट केलेले रिव्ह्यू आहे, याशिवाय, पैसे देणाऱ्या प्रभावकांनी लिहिलेले हे खोटे रिव्ह्यू आहे.

जेव्हा आम्ही एका प्रभावशाली व्यक्तीशी त्याच्या सोशल मीडियावरील सहयोगाबद्दल बोललो, तेव्हा त्याने आम्हाला काहीतरी सांगितले, जे जाणून घेतल्यावर आम्हाला समजले की रिव्ह्यू गेम कसा सुरू होतो.

तुम्ही सोशल मीडियावर collaboration हा शब्द नक्कीच ऐकला असेल, सहयोग किंवा मोहिमेच्या नावाखाली काही निवडक प्रभावकांना ब्रँडचा प्रचार करण्यास सांगितले जाते आणि त्या बदल्यात त्यांना उत्पादने किंवा पैसे दिले जातात. परंतु प्रत्येक प्रभावक तुम्हाला रिव्ह्यू देण्यासाठी ही सामग्री वापरत आहे का याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

या फोटोनुसार, हे सहयोग म्हणते की तुम्ही वस्तू ऑर्डर करा आणि उत्पादनाचे रिव्ह्यू लिहा, त्या बदल्यात तुम्हाला उत्पादनाची किंमत परत दिली जाईल. यावरून हे स्पष्ट होते की काही उत्पादनांचे परीक्षण एकतर स्वतः लिहिलेले किंवा सांगितलेले आहेत.

या प्रकरणावर, ग्राहकांच्या सोयीसाठी वर्ष २०२२ मध्ये एक नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली होती, ज्यामध्ये असे म्हटले होते की कोणत्याही प्लॅटफॉर्मवर एकदा पुनरावलोकन लिहिले गेले की ते संपादित केले जाऊ शकत नाही आणि ते हटविले जाऊ शकत नाही. याशिवाय कोणतीही वेबसाईट फेक रिव्ह्यू करताना आढळून आल्यास त्यावर कारवाई केली जाईल. ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि वेबसाइटसाठी जारी करण्यात आली आहेत.

# माशांचा मृत्यूयोग!

आपल्या साथीदारांचे मृत शरीर नजरेस पडणे हे फळांवर बसणार्या माशांना त्यांच्या मृत्यूकडे नेण्यासाठी पुरेसे आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार माशा हे दृश्य पाहिल्यानंतर डिप्रेशनमध्ये जातात आणि त्यातच त्यांचा जीव जातो. ज्या प्रजाती आपल्या आयुष्याचा बराचसा भाग कुजलेल्या पदार्थांवर मेजवानी करण्यात घालवतात त्या स्वतःच्या साथीदारांच्या मृत्यूबद्दल विशेष संवेदनशील असतात. शास्त्रज्ञांना आढळले आहे की फळांच्या माशीचे मृत शरीर इतर माशांच्या वृद्धत्वाच्या प्रक्रियेस गती देतात आणि यामुळे त्यांचे आयुष्य जवळजवळ ३० टक्के कमी होते.

फळे ही आपल्या दीर्घ आणि निरोगी आयुष्याची गरज आहे. सध्या जीवनशैलीचा वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळ्या दृष्टिकोनामधून विचार केला जातो. योगा, आहार, विहार यांचादेखील अनेक लोक विचार करताना दिसतात. यामध्ये आहारात फळे खाणे याला पूर्वीपासून महत्त्व असले तरी सध्या त्याविषयी बर्याच प्रमाणात जागरूकता आलेली दिसते, परंतु फळांच्या दुकानात फळांवर माशा बसलेल्या दिसल्या की ती फळे नकोशी वाटतात. या माशा गायब झाल्या तर? गायब नाही करता आल्या तरी त्यांचे आयुष्य मात्र कमी होऊ शकते. शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की फळांवर बसणार्या माशा त्यांच्या साथीदार मृत माशांच्या संपर्कात आल्यास त्यांचे आयुष्य कमी होते. मिशिगन विद्यापीठाच्या संशोधकांनी नुकताच हा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते भविष्यात सैनिक आणि आरोग्यसेवा कर्मचार्यांना या संशोधनाचे फायदे मिळू शकतात.

फळांवर बसणार्या माशा ही समस्या वर्षभर असते, परंतु त्या सामान्यपणे उन्हाळ्याच्या उत्तरार्धात/पावसात आढळतात. कारण त्या पिकलेली किंवा आंबणार्या फळे आणि भाज्यांकडे आकर्षित होतात. बागेतून आणलेले टोमॅटो, खरबूज, स्क्वाश, द्राक्षे आणि इतर नाशवंत वस्तू यांच्यामुळे बहुतेकदा घरामध्ये रोगाचा प्रादुर्भाव होतो. केळी, बटाटे, कांदे आणि इतर रेफ्रिजरेटेड उत्पादनांकडेही फळांवर बसणार्या माशा आकर्षित होतात. यामधून अनेक आजारांचा संसर्ग होतो.

घरे, रेस्टॉरंट्स, सुपरमार्केट आणि इतर कोठेही अन्न कुजताना आणि आंबताना दिसते. अशा ठिकाणी फळांवर बसणार्या माशा दिसणे हे एक सामान्य दृश्य आहे. प्रौढ माशांचे डोळे लाल असतात. शरीराचा पुढचा भाग करपट तपकिरी आणि मागचा भाग काळा असतो. फळांवर बसणार्या माशा आपली अंडी आंबवणारे अन्न किंवा इतर ओलसर, सेंद्रिय पदार्थांच्या पृष्ठभागाजवळ घालतात. उबवल्यानंतर लहान अळ्या आंबलेल्या पदार्थांच्या पृष्ठभागाजवळ पोसतात. फळे आणि भाज्यांचे खराब झालेले किंवा जास्त पिकलेले भाग अळ्या तयार होतील म्हणून कापले जातात. इथे अळ्यांचे प्रमाण लक्षणीय असते. फळांवर बसणार्या माशांची पुनरुत्पादन क्षमता प्रचंड आहे. त्या सुमारे ५०० अंडी घालतात. अंड्यापासून प्रौढापर्यंतचे संपूर्ण जीवनचक्र साधारण एका आठवड्यात पूर्ण होते.

फळांवर बसणार्या माशा विशेषतः स्वयंपाकघरातील पिकलेली फळे आणि भाज्यांकडे आकर्षित होतातच, शिवाय त्या नाल्यांमध्ये, कचर्याचे ढीग, रिकाम्या बाटल्या आणि डबे, कचरापेटी आणि साफसफाईच्या चिंध्यांमध्ये प्रजनन करतात. विकासासाठी आंबलेले ओलसर थर वापरले जातात. जास्त पिकलेली फळे किंवा भाज्यांपासून यांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फळांवर बसणारी माशी प्रामुख्याने उपद्रवी कीटक आहेत. त्यांच्यात जीवाणू आणि इतर रोग उत्पादक जीवांसह अन्न दूषित करण्याची क्षमतादेखील आहे. अनुवांशिक अभ्यासासाठी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात संशोधन केले जाते.

फळांवर बसणार्या माशीमधील जनुकांपैकी ७५ टक्के जनुके मानवांमध्ये रोग निर्माण करू शकतात. या माशांमध्ये आक्रमकता आणि नैराश्य मोठ्या प्रमाणात आढळले आहे. याशिवाय अनेक वर्तणुकीतील बदल तीव्र आघातजन्य एन्सेफॅलोपॅथीशी जोडलेले आहेत. एन्सेफॅलोपॅथी म्हणजे असा आजार ज्यामध्ये मेंदूचे कार्य काही एजंट किंवा स्थितीमुळे प्रभावित होते (जसे की विषाणूजन्य संसर्ग किंवा रक्तातील विष), परंतु अशी वर्तणूक का उद्भवते यामागील जीवरसायनशास्त्र अस्पष्ट आहे. यावर सातत्याने संशोधन सुरू आहे. नवे संशोधन यामध्ये निश्र्चित भर टाकणारे आहे.

आपल्या साथीदारांचे मृत शरीर नजरेस पडणे हे फळांवर बसणार्या माशांना त्यांच्या मृत्यूकडे नेण्यासाठी पुरेसे आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार माशा हे दृश्य पाहिल्यानंतर डिप्रेशनमध्ये जातात आणि त्यातच त्यांचा जीव जातो. ज्या प्रजाती आपल्या आयुष्याचा बराचसा भाग कुजलेल्या पदार्थांवर मेजवानी करण्यात घालवतात त्या स्वतःच्या साथीदारांच्या मृत्यूबद्दल विशेष संवेदनशील असतात. शास्त्रज्ञांना आढळले आहे की फळांच्या माशीचे मृत शरीर इतर माशांच्या वृद्धत्वाच्या प्रक्रियेस गती देतात आणि यामुळे त्यांचे आयुष्य जवळजवळ ३० टक्के कमी होते. या माशांचे आयुष्य साधारण ४० ते ५० दिवसांचे असते. त्यांची लांबी सामान्यतः ३ मिलीमीटर इतकी असते. माणसाची उंची आणि आयुष्य यांच्या प्रमाणाशी तुलना करता ही माणसाच्या ४०० पट आयुष्य जगते (तिच्या उंचीच्या तुलनेत). हे नवीन संशोधन अशा लोकांसाठी उपयुक्त ठरू शकते जे नियमितपणे मृत्यूने वेढलेले असतात, जसे की लढाऊ सैन्य आणि आरोग्यसेवा कर्मचारी.

मिशिगन विद्यापीठातील क्रिस्टी गेंड्रॉन आणि स्कॉट प्लेचर यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांनी अन्नाने भरलेल्या लहान कंटेनरमध्ये फळांच्या माशा वाढवल्या. इतर माशांवर काय परिणाम होतो हे पाहण्यासाठी काही डब्यांमध्ये फक्त जिवंत माशा आणि चवदार पोषक द्रव्ये ठेवली, तर काही डब्यांमध्ये ताज्या मेलेल्या फळांच्या माशा ठेवल्या. जेव्हा मेलेल्या फळांच्या माशांच्या डब्यात इतर माशांना वाढवले तेव्हा त्या दुसर्या डब्यातील माशांपेक्षा कित्येक आठवडे आधीच मृत्यू पावल्या. मृत्यूच्या संपर्कात आलेल्या माशा लवकर वयात येताना दिसल्या. साठवलेली चरबी त्या गमावतात आणि उपासमारीला लवकर बळी पडतात. अधिक तपास करण्यासाठी शास्त्रज्ञांनी एका जैविक साधनाचा आधार घेतला. मृत माशांच्या सोबत फळांच्या माशा आल्यावर मेंदूचे कोणते जाळे चालू होते हे यावरून समजले. माशांच्या मेंदूमध्ये जितके जास्त सक्रिय न्यूरॉन्स बनले, तितके त्या न्यूरॉन्सने जास्त फ्लोरोसेंट प्रोटीन तयार केले, जे माशांच्या जीवनाला संपवून टाकण्यास कारणीभूत असावे.



जेव्हा शास्त्रज्ञांनी प्रयोगांनंतर फळांवर बसणार्या माशांच्या मेंदूचे विच्छेदन केले तेव्हा त्यांना आढळले की मृत माशांनी भरलेल्या वातावरणात कीटक वाढवताना दोन विशिष्ट प्रकारचे न्यूरॉन्स, ज्यांना आर २ आणि आर ४ म्हणून ओळखले जाते, ते सक्रिय होतात. जेव्हा त्यांनी निरोगी फळांच्या माशांमध्ये हेच न्यूरॉन्स उत्तेजित केले तेव्हा त्या मृत माशांच्या सहवासात आल्या नसल्या तरीही त्यांचे जीवन कमी करणारा समान परिणाम आढळला आणि त्यांचा लहान वयातच मृत्यू झाला.

मृत शरीराकडे पाहून नैराश्य येते आणि त्याने पाहणार्याचे आयुष्य कमी होते हे या संशोधनातून पुढे आले आहे आणि ते माशांच्या बाबतीत तरी सिद्ध झाले आहे. हे संशोधन पब्लिक लायब्ररी ऑफ सायन्स बायोलॉजीमध्ये प्रकाशित झाले आहे. या संशोधनाचे वैशिष्ट्य म्हणजे माशा आपल्या मृत साथीदारांना पाहून लवकर मरतात. त्या प्रक्रियेमध्ये माशांच्या मेंदूमध्ये जे बदल होतात ते शोधून काढले आहेत. पक्षी, प्राणी आणि कीटक यांच्या बाबतीत होणारे कोणतेही संशोधन मानवास लागू पडण्याची शक्यता असते. वृद्धत्वाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी माशांचे मेंदू, त्यांचे शरीरशास्त्र कसे बदलते याबद्दल अधिक समजून घेतल्यास मानवांमध्ये वृद्धत्व कमी करण्यासाठी नवीन उपचारांचा मार्ग मोकळा होऊ शकतो, असे शास्त्रज्ञांनी सुचवले आहे. अर्थातच हे वादग्रस्त असले तरी अतिदुर्धर आजारांमध्ये उपयुक्त ठरू शकते.

**-सुजाता बाबर**

# 'तरुणाई'चा उत्कट अनुभव

तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना एक काळ असा असतो ज्यात आपल्यालाच सारं काही कळतं असा अति आत्मविश्र्वास असतो. पालकांचे सांगणे उपदेश वाटते. या अल्लड वयात जीवनाला दिशा मिळाली नाही तर आयुष्याचं जहाज खोल समुद्रात भरकटू शकतं. 'उनाड' हा चित्रपट याच तरुणाईचा एक वेगळा पैलू आपल्यासमोर प्रभावीपणे मांडतो.

प्रयोगशील वृत्तीनं दिग्दर्शक आदित्य सरपोतदारनं




'उनाड'सारखा सिनेमा बनवला आहे. एखादी गोष्ट साधी-सरळ-सोपी दाखवणं, मांडणं तितकंच कठीण आहे, म्हणूनच आदित्यचा 'उनाड' प्रयोग विशेष ठरतो. कोकणात राहणारे कोळीवाड्यातील तीन मित्र शुभम (आशुतोष गायकवाड), बंड्या (अभिषेक भरते) आणि जमील (चिन्मय जाधव) या तिघांचा तारुण्यातून प्रगल्भ होण्याचा प्रवास सांगणारी ही गोष्ट आहे. वय जेमतेम २२-२३ वर्षे. उनाडक्या करत असली तरी ती मनानं प्रामाणिक, निष्पाप आहेत, मात्र काळ सोकावायला एखादं निमित्त पुरेसं असतं. शुभमची आई आजारपणात वारली. तिच्या आजारपणात वडील बोटीवर असल्यामुळे तिच्याकडे त्यांचं दुर्लक्ष झालं असं त्याचं मत आहे. त्यामुळे वडिलांवर आणि ते करीत असणार्या मासेमारी व्यवसायावर त्याचा प्रचंड राग आहे.

जमीलच्या आईला त्यांची बंद पडलेली बेकरी विकून जमीलला त्याच्या अब्बूंकडे कुवेतला नोकरीसाठी पाठवायचं आहे. बंड्याची आई (देविका दप्तरदार) मासे विकून स्वतःचे घर चालवत आहे. त्यात बंड्याने चांगले शिक्षण घेऊन तिला हातभार लावावा ही तिची अपेक्षा आहे. तिघांचे एकएकटे असणारे पालक तिघांनाही कष्ट करून सांभाळत आहेत, मात्र तीनही मुलांचं अभ्यासाकडे लक्ष नाही. दारू पित, सिगारेटी ओढत, उनाडक्या करीत ते गावभर फिरत राहतात. अनेकदा माणसाच्या भावनोद्रेकाचा बांध फुटतो आणि तो विवेकापेक्षा मनस्वीपणाला अधिक महत्त्व देतो. इथंच शुभम चुकतो आणि जीवन त्याला एक सणसणीत चपराक लगावते. ही चपराक का? कशासाठी? त्यामुळे पुढं आयुष्यात काय बदल होतात आदी सर्व प्रश्र्नांची मार्मिक आणि साधकबाधक उत्तरं तुम्हाला या सिनेमात मिळतील.

पुण्याहून कोकणात आपल्या कुटुंबासोबत शिफ्ट झालेल्या स्वरासोबत (हेमल इंगळे) शुभमची आधी ओळख आणि नंतर मैत्री होते. शुभम या मैत्रीचा वेगळा अर्थ समजून तिच्याशी जवळीक करायचा प्रयत्न करतो, ज्यामुळे दोघांमध्ये भांडण होते. त्यात आधीपासूनच शुभमचे ज्याच्याशी वाद झाले आहेत असा पराग दोघांच्या भांडणात पडतो आणि चिडलेला शुभम परागचा सूड घेण्यासाठी त्याची एक व्हिडीओ क्लिप चित्रीत करतो आणि चुकून ती व्हायरल होते. याची परिणती शुभमला आपल्या राहत्या गावातून पळ काढावा लागतो. यानंतर तिघाही मित्रांच्या आयुष्यात अनेक बदल घडून येतात, ज्यामुळे तिघांनाही मोठेपणाची, प्रौढपणाची, जबाबदारीची जाणीव होते. ते बदल काय आहेत हे जाणून घेण्यासाठी तुम्हाला चित्रपट पाहावा लागेल. सिनेमाचा केंद्रबिंदू असलेल्या शुभमच्या (आशुतोष गायकवाड) आयुष्यात काहीतरी घडतं. शुभम त्याच्या वैयक्तिक आयुष्याचा तोल कसा सावरतो याचं चित्रण लेखक-दिग्दर्शकानं उत्कृष्टपणे केलंय.

शुभम, बंड्या आणि जमील यांची जवळच्या गावातील स्वराशी मैत्री होते. शुभम आणि स्वरा यांच्यातील मैत्री अधिक घट्ट होत असते. शुभम मैत्रीचा चुकीचा अर्थ काढतो आणि स्वराशी जवळीक करण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्या मैत्रीत मिठाचा खडा पडतो. हा खडा सर्व काही उद्ध्वस्त करून टाकतो आणि कथा वेगळं वळण घेते. सिनेमातील अनेक प्रसंग सिनेमॅटोग्राफरनं उत्तम टिपले आहेत. पात्रांची निवड हे सिनेमाचं आणखी एक बलस्थान आहे. कास्टिंग डिरेक्टर रोहन मापुस्करनं मुख्य व्यक्तिरेखांसाठी निवडलेले कलाकार शोभून दिसतात.

संदेश जाधवनं 'तांडेल' ही व्यक्तिरेखा उत्तमरित्या साकारली आहे. मुख्य भूमिकेत असलेल्या आशुतोषची मेहनत पडद्यावर दिसते. तो पडद्यावर सहजतेनं वावरला आहे. भावनिक प्रसंग त्यानं खुबीनं रेखाटले आहेत. काही कलाकृती तुम्हाला अनुभूती देतात, तर काही अनुभव सांगतात. इथे अनुभव सांगितला जात आहे असं वाटत राहतं. संवादातून अनेक वेळा प्रेक्षकांना माहिती पुरवली जाते असे वाटते. याची अनेक उदाहरणं देता येतील. बंड्याची आई किंवा जमीलची आई जेव्हा शुभमशी बोलते हे संवाद नैसर्गिक न वाटता प्रेक्षकांना बंड्या आणि जमीलची माहिती देण्याकरिता निर्माण केले आहेत असे वाटते.

जमीलचे आजोबा त्याच्याशी बोलतात किंवा स्वराची बहीण शुभमला शेवटी जेव्हा स्पष्टीकरण देते तेव्हादेखील हेच वाटते. अशा वेळेस प्रेक्षक म्हणून बघताना प्रसंगात गुंतण्याऐवजी आपण त्यातून बाहेर पडतो. प्रेक्षकांना पात्रांविषयी माहिती देणे आवश्यक असते हे कबूल, पण ती अधिक कल्पकतेने दिली असती तर प्रेक्षक प्रसंगांमध्ये खिळून राहिले असते असे सारखे वाटत राहते. अभिषेक भरते, अविनाश खेडेकर, चिन्मय जाधव, देविका दफ्तरदार, हेमल इंगळे, प्रियांका तेंडोलकर, देवेंद्र पेम, तुषार घाडीगावकर आदी सर्व कलाकारांनीही सुंदर काम केलं आहे. पडद्यावर दिसणारं भावविश्र्व मोहक आहे. त्यासाठी दिग्दर्शक महेश कुडाळकर आणि सिनेमॅटोग्राफर लॉरेन्स डकुना यांचं विशेष कौतुक. सिनेमाचं चित्रीकरण गुहागर इथल्या समुद्रकिनारी झाल्यानं ते नेत्रसुखद आहे. असं असलं तरी वातावरणनिर्मिती तयार करण्यात दिग्दर्शकानं सिनेमाचा पूर्वार्ध लांबवला आहे. सिनेमा उत्तरार्धात वेग पकडतो आणि अधिक रंजक होतो.

मुळात वेगळी बोलीभाषा, वेगळा प्रदेश, नवीन कलाकार घेणे आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे अर्धा चित्रपट हा एका बोटीवरती शूट करणे हे निश्र्चितच धाडसाचं काम आहे. याबद्दल आदित्य सरपोतदारचे अभिनंदन. 'उनाड' तांत्रिकदृष्ट्या उत्तम झाला आहे, विशेषतः सिनेमॅटोग्राफी. लॉरेन्स डिकुन्हाचा कॅमेरा कोकणातील घरं, समुद्रकिनारे, बोटी, किल्ले फार सुंदररित्या चित्रीत करतो. कोकणातील वातावरणात, तिथल्या समुद्रकिनारी, तिथल्या बाजारामध्ये, लोकांमध्ये तो क्षणात आपल्याला घेऊन जातो. चित्रपटाच्या निर्मितीमूल्यात कुठेही तडजोड जाणवत नाही. संगीतकार गुलराज सिंग आणि गीतकार गुरू ठाकूर आणि क्षितिज पटवर्धन यांची चित्रपटातील गाणी उत्तम झाली आहेत. येडा मंडोला..,हलद वाजू दे, भरती या दर्यात, मोकळा श्र्वास घे तुझा ही सर्वच गाणी छान झाली आहेत.

चित्रपटातील पात्र हसतात, रडतात, भांडण करतात, भावनिक कोलाहलातून जातात. प्रेक्षक म्हणून आपण त्यांच्या भावनेशी जोडले जातो. जुने जाणते कलाकार देविका दप्तरदार आणि संदेश जाधव आपल्या भूमिका चोख करतात. चित्रपटाच्या पहिल्या भागापेक्षा दुसरा भाग अधिक प्रभावी झाला आहे. दुसरा भाग प्रामुख्याने बोटीमध्ये, समुद्रात घडतो. त्यामुळे त्यात नावीन्य दिसून येते. बोटीवर असणार्या कोळी लोकांचं एक वेगळं आयुष्य आपल्याला यामध्ये पाहायला मिळतं. चित्रपटाची सिनेमॅटोग्राफी, गाणी आणि बोटीवरील कोळी लोकांच्या आयुष्याच्या चित्रीकरणासाठी हा चित्रपट उत्तम झाला आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, ज्योती देशपांडे, अजित अरोरा, चंद्रेश भानुशाली आणि प्रितेश ठक्कर निर्मित 'उनाड' हा सिनेमा तरुणाईच्या अनेक गोष्टींना फुंकर घालण्यात यशस्वी होतो.

'उनाड' हा चित्रपट जिओ सिनेमा ॲपवर उपलब्ध आहे. खरंतर हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्यात खरी मजा आहे, पण दापोली ते गुहागर या पट्ट्यातील विलोभनीय कोकण, अथांग समुद्र आणि कलाकारांच्या उत्तम अभिनयासाठी हा सिनेमा एकदा तरी पाहायला हवा. 'उनाड' तुम्हाला आनंद, हशा आणि मानवी नातेसंबंधांच्या जगात खोलवर जाणार्या भावनिक प्रवासात नक्कीच घेऊन जाईल.

**- आशिष निनगुरकर**

-(लेखक चित्रपट अभ्यासक आहेत.)

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## उपवास ठेवणे आहे खूप फायदेशीर, त्वचेसह कोलेस्ट्रॉल कमी होण्याचा मिळतो फायदा



श्रावण महिना सुरू आहे, या काळात लोक भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी उपवास करतात. पण उपवास केल्याने शरीराला अनेक फायदे होतात, हे तुम्ही सर्वांनी कधी ना कधी ऐकलेच असेल. अर्थात याला धर्म आणि श्रद्धेशी जोडून पाहिले जाते, परंतु विज्ञानानेही उपवासाचे फायदे सांगितले आहेत.

उपवास करताना ठराविक कालावधीसाठी खाण्यापिण्यापासून अंतर राखणे. काही लोक उपवासाच्या वेळी फक्त फळे खातात, काही लोक एक वेळचे जेवण करतात, तर काही लोक पाणीही पीत नाहीत. मात्र, तुमच्या आरोग्यासाठी उपवासाचे काय फायदे आहेत ते आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

**शरीर डिटॉक्स होते**

उपवासामुळे आपले शरीर डिटॉक्स होते. होय, तुम्ही अगदी बरोबर वाचले आहे. एका संशोधनानुसार, उपवासात अन्नाऐवजी द्रव पदार्थांचा समावेश केला, तर शरीर योग्य प्रकारे डिटॉक्स करते. त्यामुळे त्वचा आणि पोटाशी संबंधित आजार कमी होतात.

**वजन कमी करण्यात फायदेशीर**

खराब जीवनशैली आणि आहारामुळे बहुतेक लोकांसाठी लठ्ठपणा ही समस्या बनत आहे. लठ्ठपणाची वेळीच काळजी घेतली नाही, तर अनेक शारीरिक समस्या उद्भवू शकतात. उपवास ठेवल्याने वजन नियंत्रित राहण्यासही मदत होते. आम्ही तुम्हाला सांगतो की अधूनमधून उपवास केल्याने चरबी कमी केली जाऊ शकते.

**कमी होतो कोलेस्ट्रॉलचा धोका**

कदाचित तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की उपवास केल्याने कोलेस्ट्रॉलच्या समस्येपासूनही आराम मिळतो. यामुळे खराब कोलेस्ट्रॉलचा धोका कमी होतो. एका दिवसाच्या अंतराने उपवास करून कोलेस्ट्रॉल कमी करता येते.

**त्वचेसाठी फायदेशीर**

उपवास केल्याने शरीर विषमुक्त होते. शरीराचे डिटॉक्सिफिकेशन झाल्यावर शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात. यामुळे त्वचा चमकण्यासोबतच चमकते.

## गॅसच्या समस्येने हैराण आहात? जाणून घ्या झटपट आराम मिळवण्याचा सर्वोत्तम मार्ग



बऱ्याच वेळा खराब जीवनशैलीमुळे किंवा तेलकट, तळलेले आणि शिळे अन्न खाल्ल्याने गॅस्ट्रिकचा त्रास सुरू होतो. गॅस, ॲसिडीटी, छातीत जळजळ, अपचन आणि तीव्र पोटदुखी यांसारख्या समस्या उद्भवू लागतात. कधी-कधी प्रवास, गर्भधारणा, दुग्धजन्य पदार्थांचा अतिवापर, ताणतणाव आणि आहारात फायबरची कमतरता यांमुळेही पोटात गॅसचा त्रास होऊ शकतो. गॅस ही गंभीर समस्या नाही. मात्र, त्याचा त्रास दुसऱ्यांदेखील होतो. गॅस्ट्रिक समस्या घरगुती उपायांचा अवलंब केल्याने तुम्ही यापासून त्वरित आराम मिळवू शकता.

पोटात गॅस होण्याच्या समस्येपासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उपाय

कोमट पाणी : कोमट पाण्याने पचनक्रिया चांगली राहते. अपचनामुळे होणाऱ्या पोटदुखीपासूनही आराम मिळतो. गॅस्ट्रिकचा त्रास जास्त असल्यास गरम पाण्यात ओवा किंवा जिरे टाकून प्यायल्याने आराम मिळतो.

काळी मिरी : आयुर्वेदात काळी मिरी जठरासंबंधी समस्या दूर करण्यासाठी गुणकारी मानली जाते. काळी मिरी इतर अनेक समस्यांवर प्रभावी उपाय मानली जाते. अशा परिस्थितीत जेव्हा जेव्हा गॅस किंवा अपचन सारख्या समस्या उद्भवतात, तेव्हा काळी मिरी खाल्ल्याने या समस्या दूर होतात.

बडीशेप : गॅस्ट्रिकच्या समस्यांपासून दूर राहण्यासाठीही बडीशेप खूप उपयुक्त आहे. तसेच तोंडाची चवही खराब होऊ देत नाही. याच्या वापराने गॅस्ट्रिक आणि ॲसिड रिफ्लक्स सारख्या समस्या दूर होतात.

आले : आल्याचा रस कोमट पाण्यात आणि साखर मिसळून सेवन करा. आयुर्वेदात पोटाशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी हे गुणकारी मानले जाते. आल्याबरोबरचा काळा चहा देखील गॅस्ट्रिकच्या समस्यांमध्ये त्वरित आराम देतो.

लिंबू : लिंबूचे सेवन गॅस्ट्रिक, अपचन, हार्ट बर्न यासारख्या समस्या दूर करण्यासाठी प्रभावी असल्याचे अनेक संशोधनांमध्ये आढळून आले आहे. लिंबाचा रस पाण्यात मिसळून प्यायल्याने बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते आणि पचनक्रिया सुधारते. सकाळी याचे सेवन करणे फायदेशीर मानले जाते.

ओवा : ओवा झटक्यात जठरासंबंधी समस्या दूर करू शकते. अर्धा चमचा ओवा आणि अर्धा चमचा मीठ एकत्र सेवन केल्याने गॅस्ट्रिकचा त्रास दूर होतो.

## फ्रीजमध्ये मळून ठेवलेले पीठ तुम्हाला करू शकते आजारी ! लक्षात ठेवा या गोष्टी



पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे संसर्ग होण्याचा धोका सर्वाधिक असतो. त्यामुळे पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. या ऋतूतील बदलामुळे शरीरातील चयापचय क्रियाही मंदावते. यामुळेच आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही कमकुवत होते, त्यामुळे आजार होण्याचा धोका जास्त असतो.

पावसाळ्यात अशा अनेक गोष्टी असतात, ज्या टाळल्या पाहिजेत. एवढेच नाही तर या ऋतूत जर तुम्ही पीठ मळून फ्रीजमध्ये ठेवले आणि वापरत असाल, तर आतापासून ही चूक करू नका. यामुळे आपले आरोग्य बिघडण्याचा धोका आहे. फ्रीजमध्ये ठेवलेले पीठ का वापरू नये ते जाणून घेऊया.

**ओलाव्यामुळे खराब होते पीठ**

कधीकधी आपण पीठ एकदाच मळून घेतो आणि बरेच दिवस वापरतो. आपण ते पीठ फ्रीजमध्ये ठेवतो, जेणेकरून खराब होणार नाही. पण पावसाळ्यात मळलेल्या पिठात बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता जास्त असते. असे काही जीवाणू असतात, त्यामुळे अन्नातून विषबाधा होण्याची शक्यता जास्त असते. याशिवाय ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठतेचीही तक्रार असते.

**कमी तापमानात बॅक्टेरिया**

संशोधनानुसार, कमी तापमानात जास्तीत जास्त जीवाणू वाढण्याची शक्यता असते. पावसाळ्यात लिस्टेरिया मोनोसाइटोजेन्स नावाच्या बॅक्टेरियामुळे गंभीर आजार होऊ शकतात. फ्रीजच्या कमी तापमानातही ते सहज वाढू शकते. फ्रीजमध्ये कोणतीही वस्तू ठेवण्यापूर्वी ती स्वच्छ करणे महत्त्वाचे आहे.

**कसे ठेवायचे मळलेले पीठ**

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात फक्त ताजे पीठ वापरावे. दुसरीकडे, जर तुम्हाला पीठ मळून घ्यायचे असेल आणि ते फ्रीजमध्ये ठेवायचे असेल, तर ते मळताना जास्त पाणी घालू नका. त्यामुळे पीठ लवकर खराब होते. फ्रीजमध्ये पीठ ठेवण्यासाठी कंटेनर किंवा झिप लॉक बॅग वापरा.

## साबुदाणा खाण्याचे ५ नुकसान

अनेकदा उपवासाच्या दिवसांत आपण साबुदाणा फराळात वापरतो. इतकेच नाही तर आपण त्यात बटाटे मिसळून त्याचे पदार्थ बनवल्यानंतर खातो, परंतु या दोन्ही गोष्टी बद्धकोष्ठता आणि पचन बिघडवण्याचे काम करतात.

खिचडीसाठी नेहमी चांगल्या प्रतीचा साबुदाणा विकत घ्यावा. फराळात खाल्लेला साबुदाणा



तुमच्या आरोग्यासाठी कसा हानिकारक ठरू शकतो हे तुम्हाला येथे जाणून घेणे आवश्यक आहे.

आपल्या आरोग्यासाठी साबुदाणा खिचडी खाण्याचे काय तोटे आहेत ते या लेखात जाणून घेऊया-

१. साबुदाणा जास्त प्रमाणात खाल्ल्याने मेंदू आणि हृदयाचे नुकसान होते, श्वास घेण्यासही त्रास होऊ शकतो.

२. साबुदाण्याची खिचडी जास्त प्रमाणात खाल्ल्याने उलट्या, रक्ताचे विकार, डोकेदुखी, छातीत दुखणे आणि थायरॉईड सारख्या अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

३. साबुदाणामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते आणि कार्बोहायड्रेट्सचे जास्त सेवन शरीरातील साखरेची पातळी वाढवण्याचे काम करते. त्यामुळे जर तुम्हाला मधुमेहाचा त्रास होत असेल तर साबुदाणा कमी प्रमाणात खावा. तुम्हाला तुमच्या आहारात याचा समावेश न करण्याचा सल्ला दिला जातो. किंवा अधिक प्रमाणात सेवन करण्यापूर्वी तुमच्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्या.

४. साबुदाणामध्ये कॅलरीजचे प्रमाण चांगले असल्याने ते तुम्हाला वजन वाढणे आणि लठ्ठपणाचे शिकार बनवू शकते, ज्यामुळे हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब समस्या, युरिन स्टोन, कर्करोग यांसारख्या अनेक आजारांनाही आमंत्रण मिळते.

५. किडनी स्टोन / किडनी स्टोनच्या रुग्णांना अनेक गोष्टी खाण्यास मनाई आहे. जर तुम्हालाही किडनी स्टोनच्या आजाराची समस्या असेल तर साबुदाणा खिचडीचे सेवन करू नका. यामुळे तुमची किडनी स्टोनची समस्या अधिक वाढू शकते.



## जोडीदारासोबतचे नाते होईल अधिक घट्ट, आजपासूनच करा या सवयींचे आचरण

मजबूत नातेसंबंधाचा पाया जोडीदाराच्या भेटीतूनच तयार होतो. नात्यात किरकोळ भांडणे होणे ही सामान्य गोष्ट आहे, पण जेव्हा ते मर्यादेपलीकडे जाते, तेव्हा प्रेमाचा पायाच डळमळू लागतो. असे म्हणतात की मजबूत नाते तेच असते ज्यामध्ये प्रेम टिकते. पण कधी कधी प्रेम टिकवण्यात अनेक अडचणी येतात.

दोन व्यक्तींमधील नाते घट्ट असावे, यामध्ये जोडप्याच्या सवयीही महत्त्वाची भूमिका बजावतात. येथे आम्ही तुम्हाला जोडप्यांच्या काही सवयींबद्दल सांगणार आहोत, ज्यामुळे त्यांचे नाते अधिक घट्ट होते.

**विश्वास असणे आवश्यक आहे**

नात्यात प्रेम टिकून राहण्यासाठी जोडप्यांमध्ये विश्वास असणे आवश्यक आहे. जेव्हा दोन व्यक्तींमध्ये विश्वास नसतो, तेव्हा त्यांच्यात दुरावा निर्माण होतो. तुमचे नाते अबाधित ठेवण्यासाठी तुम्ही एकमेकांवर विश्वास ठेवला पाहिजे. कठीण काळात एकमेकांवर विश्वास दाखवा.

**गोष्टी लपवू नका**

नात्याचे बंध अधिक घट्ट होण्यासाठी काहीही मनात ठेवू नका. जेव्हा दोन व्यक्ती एकमेकांपासून गोष्टी लपवतात, तेव्हा नात्याचा पाया कमकुवत होतो. त्यामुळे जोडप्यांनी एकमेकांपासून अजिबात गोष्टी लपवू नयेत. काही कारणास्तव नात्यात दुरावा आला, असेल तर दोघांनीही एकमेकांशी बोलून ते सोडवावे.

**एकमेकांचे कौतुक करा**

जोडप्यांनी एकमेकांची प्रशंसा केली पाहिजे. तुम्हाला तुमच्या जोडीदाराबद्दल जे काही आवडते, त्यामुळे जेव्हा जेव्हा तुम्हाला संधी मिळेल तेव्हा तुमच्या जोडीदाराचे कौतुक करा. त्यांना चांगले आणि आपलेपणाची भावना द्या. जेव्हा तुम्ही त्यांना विशेष वाटतात तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

**एकत्र वेळ घालवा**

व्यस्त जीवनशैलीत कामाचा ताणही वाढला आहे. काही वेळा अंतरामुळे जोडप्यांच्या नात्यात तडा जाऊ लागतो. त्यामुळे त्यांच्यासोबत जास्तीत जास्त वेळ घालवा. एकत्र वेळ घालवल्याने प्रेम वाढते आणि आत्मविश्वासातही बदल दिसून येतो.

## लहान मुलांचा आहार कसा असावा....?

आजचा काळात आई-वडील दोघेही कामकाजी असून कुटुंब देखील सीमित झाले आहे. आई-वडील आणि त्यांची मुलं. अशा स्थितीत जिथे घरात मुलांकडे लक्ष देणारे कोणीच नसते. त्यामुळे मुलांच्या जेवणाची आभाळ होऊ लागते. जेवणाची आवड निवड जास्त व्हायला लागते. किंवा मुले जेवण्याचा कंटाळा करू लागतात. खाण्याचा त्रासाने हतबल झालेले आई-वडील मुलांना बाहेरचे खाऊ घालणे जास्त पसंत करतात ज्यामुळे मुलांना बाहेरचे पिझ्झा, बर्गर, चॉकलेट, आइसक्रीम, चिप्स आवडू लागतात. अशाने त्यांना चांगले पोषक आहार मिळत नसल्याने ते वारं-वारं आजारी पडतात. त्यांची शारीरिक, मानसिक वाढ कुंठते. लहान मुलांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी त्यांना पोषक आहाराची गरज असते. त्यांचा सर्वांगीण विकासासाठी समतोल आणि संतुलित आहार गरजेचे असते. आपली मुलं सर्व ठिकाणी पुढे असणे अशी पालकांची इच्छा असते. अश्या वेळी त्यांना योग्य आहार मिळाला नाही तर त्यांचा आरोग्यांवर दुष्परिणाम होतो. लहान मुलांच्या आवडी -निवडी खूप असतात. त्यांना त्यांच्या आवडीचे पदार्थ मिळाले नाही तर ते जेवायला कंटाळा करतात. त्यांना खाऊ घालणे हे कठीण होते. त्यासाठी आई ने काही आहारपद्धतीचा वापर करायला हवा.



मुलांच्या योग्य वाढीसाठी दिवसांतून ३ - ४ वेळा खायला हवे. सकाळी नाश्ता, मग दुपारचे संतुलित आहाराचे जेवण, संध्याकाळी काही स्नेक्स आणि रात्रीचे हलके जेवण. अश्या प्रकारे नियोजन करून आपण आपल्या मुलाच्या आहार कडे लक्ष देऊ शकता.

मुलांच्या दररोजच्या जेवणात सगळे पदार्थ - पोळी, भाजी, वरण-भात, कोशिंबीर, सॅलडचा समावेश असला पाहिजे. मुलांना आठवड्यातील साही दिवस पौष्टिक आहार दिले पाहिजे.

आपल्याकडे सण-वार इतके असतात, त्यामुळे मुलांना आपल्या संस्कृती आणि त्याच्याशी निगडित जेवणाच्या पद्धती आणि प्रकार कळायला पाहिजे त्याचप्रमाणे हे सगळे पदार्थ मुलांना खाऊ घालायला हवे. रात्रीचे जेवण हलके आणि सुपाच्य असले पाहिजे. रात्रीच्या जेवणात विविधता असायला हवी. पचायला सोपे असले पाहिजे. खिचडी, मऊ भात, वरण, भाजी, पोळी असे पदार्थ हवे.

रोजच्या जेवणात तूप द्यायला पाहिजे. तूप स्निग्ध असल्याने शरीरास गरजेचे असते. दर रविवारी मुलांच्या आवडीचे पदार्थ करावे. त्यामध्ये पण पौष्टिक आहाराचा समावेश पाहिजे. पदार्थ बाहेरचे नको तर घरात बनवलेले असावे.

बाहेरचे जंक फूड पिझ्झा, पास्ता, बर्गर, नूडल्स देणे कटाक्षाने टाळावे तसेच कोल्ड ड्रिंक(शीत पेय) देणेसुद्धा टाळावे.

मुलांना आठवड्यातून एकदाच बाहेर जेवायला घेऊन जायला पाहिजे. पण त्यात जंक फूडचा समावेश नसावा.

वरील दिलेले पथ्य पाळले तरच आपण आपल्या मुलांचे आरोग्यास चांगले ठेवू शकता आणि मुलांना सगळं खायची सवय लागेल व त्यांची शारीरिक, मानसिक वाढ उत्तमरीत्या होऊ शकते.

## तुम्हीसुद्धा प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताय तर आत्ताच व्हा सावधान

जगभरात वाढणारे प्रदूषण टाळण्यासाठी प्लास्टिकवर पूर्णपणे बंदी घालणे फार महत्वाचे आहे . हे युग प्लास्टिकचे युग बनले आहे, आज संपूर्ण जगात प्लास्टिकने मजबूत पकड बनवली आहे. त्याचा आकार एका प्रचंड राक्षसासारखा झाला आहे.

प्लास्टिक नष्ट करण्याचा कोणताही प्रभावी मार्ग नाही. परंतु हे जाणून घेतल्यानंतरही आजही देशात अनेक ठिकाणी प्लास्टिकच्या पिशव्या अंधाधुंदपणे वापरल्या जात आहेत, हे स्पष्ट झाले आहे की प्लास्टिक आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे परिणाम करते. छोटे दुकान असो की मोठे दुकान, सर्वत्र प्लास्टिक पिशव्या वापरल्या जात आहेत. प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे होणारा वापर आणि हानी पाहून संपूर्ण जग चकित झाले आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांना पर्याय म्हणून कापड आणि कागदी पिशव्या समोर येतात.

सर्व प्रथम, आपण जेव्हा बाजारातून भाज्या किंवा फळे प्लास्टिक पिशवीत घेऊन घरी आणता तेव्हा बर्याच वेळा आपण त्यांना ताबडतोब प्लास्टिकच्या बाहेर काढण्यास विसरता आणि हेच कारण आपल्या आरोग्यासाठी कुठेतरी खूप हानीकारक असते. खरं तर, बंद प्लास्टिकमध्ये ठेवलेल्या वस्तूंना हवा मिळत नाही आणि त्यामुळे त्यामध्ये ठेवलेला सामान पटकन खराब होते यानंतर, किटाणू प्लास्टिकमध्ये ठेवलेल्या आपल्या फळांवर आणि भाज्यांवर आक्रमण करतात आणि त्वरित खराब करतात.

एवढेच नाही तर आपण प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले अधिक रस्ट फूड घेत असाल तर आजपासून ते सोडा कारण बहुतेक रसायने अशा प्रकारच्या खाद्यपदार्थांमध्ये तयार होतात आणि हे कचरा रसायने थेट आपल्या पोटात जातात, म्हणूनच प्लास्टिक नेहमीच वापरत राहू नये. त्याऐवजी तपकिरी कागदाचा वापर करा. ते सत्य हे आहे की प्लास्टिक हे पर्यावरणासाठी आणि संपूर्ण इकोसिस्टमसाठी प्रत्येक टप्प्यावर धोकादायक आहे.

प्लास्टिक पिशव्या आणि स्टोरेज कंटेनर खाद्यपदार्थांमध्ये रसायने सोडतात. ३ आणि ७ मात्रावाल्या प्लास्टिकपासून बनलेल्या कंटेनरमध्ये जास्त धोका असतो.

या प्लास्टिकमध्ये बिस्फेनॉल ए (बीपीए) नावाचे एक केमिकल असते. प्लास्टिकच्या वस्तूंमध्ये बीपीएऐवजी फथलाट्स हे सर्वात जास्त वापरले जाणारे रसायन आहे. हे प्लास्टिक लवचिक बनवते. ही रसायने आपल्या शरीरातील हार्मोन्सवर परिणाम करतात. म्हणूनच प्लास्टिक वापरणे टाळावे.

## एचआयव्हीमुक्त झाला रुग्ण, जगातील सहावे असे प्रकरण, जाणून घ्या कसे झाले उपचार

जिनेव्हामध्ये एक रुग्ण पूर्णपणे एचआयव्हीमुक्त झाल्याची घटना समोर आली आहे. जगातील अशा प्रकारची ही सहावी घटना आहे. स्वित्झर्लंडमधील या रुग्णाला 'द जिनिव्हा पेशंट' असे नाव देण्यात आले आहे. डेली मेलच्या रिपोर्टनुसार, रुग्णाला २०१८ पासून रिस्क थेरपी दिली जात होती. रुग्णाच्या अनेक चाचण्या केल्या, अहवालात असे आढळून आले की त्याच्या रक्तात मानवी इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस म्हणजेच एचआयव्ही नाही.

रुग्ण अधिक तपणे बरा झाल्याचे घोषित करण्यापूर्वी एचआयव्हीची औषधे थांबवण्यासाठी डॉक्टरांनी पाच वर्षे प्रतीक्षा करणे पसंत केले. परंतु अलीकडील प्रकरणात, बऱ्याच काळानंतर व्हायरसची पुष्टी झाली नाही. अशा परिस्थितीत या रुग्णाला पूर्णपणे एचआयव्हीमुक्त झालेल्या पाच रुग्णांच्या यादीत ठेवण्यात आले आहे.

अहवालानुसार, नुकताच एचआयव्हीमुक्त झालेल्या रुग्णावरही याआधीच्या इतर ५ रुग्णांप्रमाणेच उपचार करण्यात आले. त्याच्यावर उपचारासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटही करण्यात आले होते. रुग्णावर जिनिव्हा विद्यापीठाच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. रुग्णालयाच्या एचआयव्ही/एड्स युनिटचे संचालक डॉ. अलेक्झांडर कॅल्मी म्हणतात की जिनिव्हा रुग्णांच्या बाबतीत अवलंबलेली उपचार पद्धती अशा सर्व रुग्णांना लागू केली जाऊ शकत नाही, कारण ती अत्यंत आक्रमक उपचार आहे.

रुग्णावर उपचार यशस्वी झाले आहेत. उपचारादरम्यान, असे आढळून आले की दात्याच्या रक्तपेशींनी रुग्णाच्या रक्तपेशी पूर्णपणे बदलल्या आहेत. त्यामुळे एचआयव्ही बाधित पेशी कमी होऊ लागल्या. त्यांची संख्या कमी होऊ लागली. त्यांच्या संपूर्ण बदलानंतर, रुग्णाची अनेक टप्प्यांत तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये व्हायरसच्या उपस्थितीची पुष्टी झाली नाही आणि रुग्ण एचआयव्हीमुक्त झाला.

रुग्ण बराच काळ एचआयव्हीसह जगत होता, ज्यामध्ये



पांढऱ्या रक्त पेशी आणि रोगप्रतिकारक शक्तीवर संक्रमणामुळे थेट हल्ला होतो. अशा रुग्णाला एचआयव्ही मुक्त करण्यासाठी, एआरटी म्हणून ओळखली जाणारी थेरपी दिली जाते. या थेरपीमध्ये, तज्ञ रुग्णाला दररोज अनेक प्रकारच्या औषधांचे मिश्रण घेण्याचा सल्ला देतात. एचआयव्हीवर आजपर्यंत कायमस्वरूपी इलाज विकसित झालेला नाही. एआरटी थेरपीमध्ये सध्या ८ औषधांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यांना अन्न व औषध प्रशासनाने मान्यता दिली आहे. ही औषधे विषाणूची प्रतिकार शक्ती कमी करतात, ज्यामुळे तो कमकुवत होतो आणि मरतो.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगभरात सुमारे ४० दशलक्ष लोक एचआयव्हीशी झुंज देत आहेत. एचआयव्ही संक्रमित व्यक्तीचे रक्त, आईचे दूध, वीर्य आणि योनिमार्गातून निरोगी व्यक्तीमध्ये पसरतो. हे गर्भधारणेदरम्यान आणि लैंगिक संभोग दरम्यान निरोगी व्यक्तींमध्ये पसरते. या विषाणूवर वेळीच उपचार न केल्यास ते एड्सचे कारण बनू शकतात.

लातूर **भूकंप**
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
सोमवार २४ जुलै २०२३


## गांजाची झाडे लावली शेतकऱ्याविरूद्ध गुन्हा दाखल

भादा : भादा शिवारामध्ये एका शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये गांजाची झाडे जोपासली म्हणून त्याच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

योगेश दत्ता कात्रे रा. भादा यांनी आपल्या सर्वे नं. ३३७ क शिवारात प्रतिबंधीत गांजा झाडाची जोपासना केली म्हणून भादा पोलिसांत त्याच्या विरोधात एनबीपी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## मनपाच्या १६ शाळांतील १२४० विद्यार्थ्यांना डिक्शनरीचे वाटप

लातूर : विद्याभारती प्रकाशन, लातूरच्या सहकार्याने, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन मार्फत शहरातील मनपाच्या १६ शाळांमधील १२४० विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्दार्थ व सेमी इंग्रजी डिक्शनरीचे वाटप करण्यात आले.

महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक ९,मंठाळे नगर,लातूर येथील ५७० विद्यार्थ्यांना हा संच देण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक धोंडीराम भिंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत रोटरी मिडटाऊनचे अध्यक्ष रविंद्र बनकर यांच्या वाटप करण्यात आले. यासाठी प्रकल्प चेअरमन यश कुलकर्णी, संचालक ओमप्रकाश झुरळे,अमोल दाडगे, सचिव डॉ. अविनाश भोसले यांनी परिश्रम घेतले. क्लबचे माजी अध्यक्ष सुनील परांडेकर व विष्णुदास तोष्णीवाल यांच्यासह संचालक जगदीश कुलकर्णी,डॉ. दिनेश सोनी तसेच अजय डुडिले व दिलीप सोनी आदींची यावेळी उपस्थिती होती.



## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत द्या, पोकळ घोषणा नको : नाना पटोले

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यावर संकटाचे आभाळ कोसळले आहे पण राज्य सरकारची मदत काही पोहचत नाही. राज्य सरकार केवळ घोषणा करते त्याची अंमलबजावणी होत नाही. मागील वर्षी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची मदत अजून मिळालेली नाही, त्याचा सर्वेही केलेला नाही. सरकारकडे तलाठी, कृषी सहाय्यक ही यंत्रणा नाही. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला राज्य सरकारने तातडीने सरसकट मदत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

अधिवेशनातील चर्चेत भाग घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, पावसामुळे लाखो होक्टर शेती पाण्याखाली गेली आहे तर लोकांच्या घरात पाणी शिरले आहे, अन्नधान्य वाया गेला आहे, लोक उपाशी आहेत. शेतकऱ्यांच्या, गरिबांच्या डोळ्यातले अश्रु थांबत नाहीत. कृषीप्रधान राज्यात शेतकरी व गरिबांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. हा विषय राजकारण करण्याचा नाही, ज्यांचे- ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना सरकारकडून भरीव मदत दिली पाहिजे. सरकार कोटच्यवधी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मंजूर करुन घेते मग शेतकऱ्यांना मदत का होत नाही. शेतकऱ्यांचा, सर्व सामान्य जनतेचा या सरकारवर विश्र्वासच राहिलेला नाही, हा विश्र्वास पुन्हा मिळवण्याची गरज आहे. अधिकाऱ्यांना सुचना केल्या आहेत असे मंत्री सांगतात पण प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही. एक रुपयात वीमा अशी सरकारने घोषणा केली आहे, त्याबाबतचे निवेदनही होणे गरजेचे आहे. मदतीसंदर्भात सरकारची भूमिका सुस्पष्ट असायला हवी अशी कांग्रेसची भूमिका आहे.

विधानभवन परिसरात मणिपूरमधील परिस्थितीवर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, मणिपूरमधील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून या परिस्थितीला मणिपूरचे भाजपा सरकार व केंद्रातील मोदी सरकारच जबाबदार आहे. मणिपूरमधील भाजपा आमदारानेच मुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्र्यावर गंभीर आरोप केले आहेत. सरकारच एका जातीवर अत्याचार करण्यास प्रोत्साहन देत आहे आणि कारवाई मात्र केली जात नाही. महिलेला विवस्त्र करून तिची धिंड काढून तीच्यावर अत्याचार करण्यात आल्याच्या आणखी चार घटना घडल्याचे या स्थानिक आमदारानेच जाहीरपणे सांगितले आहे. या घटनांची माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्र्यांना दिली पण त्यासंदर्भात कारवाई काही झाली नाही असा गंभीर आरोप त्या आमदाराने केला आहे.

मणिपूरमधील ज्या महिलेवर अत्याचार करण्यात आला तीचा पती कारगिल युद्धाचा हिरो आहे. देशाला वाचवण्यासाठी जिवाची पर्वा न करता त्याने विजय मिळवला, भारतमातेला त्याने वाचवले पण स्वतःच्या पत्नीची इज्जत मात्र तो वाचवू शकला नाही. मणिपूर जळत आहे पण मोदी सरकार व भाजपाला त्याचे काही देणेघेणे नाही. देशात व राज्यात लोकशाहीला काळिमा फासण्याचे काम भाजपा करत आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

आषाढी वारीच्यावेळी आळंदीत झालेल्या वारकऱ्यांवरील लाठीहल्ला प्रकरणी अधिवेशनाचे कामकाज सुरु होण्याआधी विरोधीपक्षांनी विधान भवनच्या पायऱ्यावर आंदोलन केले. वारकऱ्यांवर लाठीहल्ला करणाऱ्या सरकारच्या विरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## दयानंद विज्ञानमध्ये लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२३ जुलै २०२३ रोजी लोकमान्य टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी भारतीय असंतोषाचे जनक,भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक मजबूत जहालवादी नेते आणि स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! अशी घोषणा देणारे लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा.संध्या कोल्हे,डॉ.महादेव पंडगे,प्रा.मनीषा बाजपाई,प्रा.भिसे,प्रा.आशाकांत भालेराव,सुदाम सातपुते,बालाजी पिटले यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शासकीय योजना लाभार्थ्यांच्या घरापर्यंत पोहचविणार-आ. अभिमन्यू पवार

लातूर : केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांच्या घरापर्यंत सर्वेक्षण करून पोहचविणारे,असे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा येथे आयोजित केलेल्या 'केंद्र शासनाच्या मल्टिमीडिया चित्रप्रदर्शन 'व 'शासन आपल्या दारी- लाभार्थी घरोघरी ' योजनेच्या शुभारंभ प्रसंगी केले.

केंद्र शासनाच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालय, केंद्रिय संचार ब्यूरो, जिल्हा प्रशासन लातूर आणि क्रिएटिव्ह फाउंडेशन यांच्या माध्यमातुन ९ वर्षे सेवा सुशासन गरीब कल्यानाची मल्टिमीडिया चित्रप्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी आमदार श्री पवार बोलत होते.

यावेळी व्यासीठावर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शोभा जाधव, पोलिस उपअधिक्षक रामदास इंगवले, औशाचे तहसिलदार भरत सुर्यवंशी,निलंगा येथील तहसिलदार श्रीमती उषाकिरण श्रुंगारे, गट विकास अधिकारी युवराज म्हेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

दारापर्यंत जाऊन शासकिय योजनांचा लाभ पोहोचवणार असल्याचे त्यांनी सांगितले.आमदार श्री पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची प्रगती जलदगतीने होत आहे. एकेकाळी जागतिक अर्थव्यवस्थामध्ये १० वा क्रमांक असणारा भारत आज अर्थव्यवस्थेमध्ये ३ ऱ्या क्रमांकावर आहे. केंद्र शासनाच्या उज्ज्वला गॅस योजना, मुद्रा योजना, स्टार्ट अप इंडिया, स्वच्छ भारत मिशन, बेटी बचाव बेटी पढाव सारख्या कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल म्हणाले, केंद्रीय शासकिय योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहचत नाही परंतु आज याठिकाणी केंद्रिय संचार ब्यूरो यांनी आयोजित केलेल्या मल्टिमीडिया प्रदर्शनात



अनेक योजनांची माहिती दिली आहे. त्याचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

श्री चव्हाण यांनी प्रास्ताविकेत म्हणाले, केंद्र शासनाने मागील ९ वर्षात अनेक कल्याणकारी योजना, उपक्रम, निर्णय आणि विकास्तमक धोरणांची माहिती चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. यामध्ये पंतप्रधान घरकुल योजना, सुकन्या समृध्दी योजना, पी एम गतिशक्ती योजना, पंतप्रधान पीक विमा योजना यासारख्या विविध योजनांची माहिती दिली आहे. सदर प्रदर्शन हे उद्या सायंकाळी ६ वाजे पर्यंत लोकांना बघण्यासाठी विनामूल्य खुले असणार आहे.

कार्यक्रमात शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, संजय गांधी निराधार योजना, जिल्हा परिषदच्या सेस फंडातील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश, प्रमाणपत्र आणि लॅपटॉप वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री ए कुंभार यांनी केले. चित्रप्रदर्शनामध्ये तहसिल कार्यालय, आरोग्य विभाग, जल संधारण विभाग, पंतप्रधान ग्रासडक विभाग, पंचायत समिती, नगर परिषद, बाल विकास प्रकल्प आणि पोलीस विभाग आदी विभागांच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे माहिती दालन ठेवण्यात आले आहे.

या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी सहायक प्रसिध्दी अधिकारी अंबादास यादव, अपर तहसिलदार नायब निलेश व्होनमोरे, तहसिलदार इंद्रजित गरड, कार्यालय सहायक जे एम हनूरे,साईराज राऊळ, सूरज जाधव आणि तहसिल कार्यालयाचे कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल, पोलीस पाटील आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाजाची गरज ओळखून कार्य करणारी एकमेव जागतिक संघटना म्हणजे रोटरी क्लब-लातुरे

अहमदपूर : येथील सामाजिक कार्यात स्वखर्चातून कार्य करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ अहमदपूर चा २०२३ -२४ चा पदग्रहण समारंभ संस्कृती फंक्शन हॉल येथे नियोजित प्रांतपाल (२०२५-२६) सुधीर लातूरे व सहप्रांतपाल विशाल जैन यांचे उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी मावळते अध्यक्ष रो.जीवन कापसे यांनी नूतन अध्यक्ष रो. शिवशंकर पाटील यांना तर मावळते सचिव रो कपिल बिरादार यांनी नूतन सचिव रो श्रीराम कलमे यांना कॉलर प्रदान करून पदभार दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मावळते सचिव रो. कपिल बिरादार यांनी मागील वर्षीच्या कार्याचा आढावा मांडला तर नूतन अध्यक्ष रो. शिवशंकर पाटील यांनी पुढील वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या प्रोजेक्ट बद्दल माहिती दिली व नूतन संचालक मंडळाची घोषणा केली. यावर्षीचा रोटरी चा विशेष पुरस्कार राज्यस्तरीय शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ताभाऊ गलाले यांना देण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी सुधीर लातूरे बोलताना म्हणाले अहमदपूर रोटरी ही गेली ३५ वर्षापासून समाजाची गरज ओळखून स्वखर्चातून त्यांना मदत करण्याचे काम अविरत करत आहे. पुढे बोलताना लातूरे म्हणाले रोटरी ही जागतिक स्तरावर सेवाभावाने काम करणारी एकमेव संघटना आहे. आपल्या डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये अनेक ग्लोबल ग्रँड प्रोजेक्ट निर्माण झाले आहेत. प्रत्येक रोटरी मेंबर हा स्वतःच्या उत्पन्नातील काही हिस्सा केवळ समाजकार्यासाठी व रोटरीच्या माध्यमातून नवीन मित्र जोडण्यासाठी खर्च करत असतो. रोटरी क्लब साठी कुठलाही शासकीय फंड नसून संपूर्ण जगभरात रोटरी सभासदांच्या सहकार्यातुनच मोठी काम होत असते. त्याचाच एक भाग अहमदपूर रोटरी आहे. अहमदपूर मध्ये पुढील काळात एखादा कायमस्वरूपी रोटरीचा प्रकल्प व्हावा असे ही ते म्हणाले.

यावेळी सहप्रांतपाल विशाल जैन यांनी प्रांतपाल रो स्वाती हेरकल यांचा शुभ संदेश व पुढील वर्षभरात परिवर्तन प्रोजेक्टच्या माध्यमातून करावयाच्या उपक्रमाविषयी माहिती दिली. यावेळी नूतन सदस्य म्हणून डॉ ऋषिकेश पाटील, डॉ अतुल खडके, आशिष आंधळे, डॉ नेहा पाटील, डॉ अंजली उगिले,संगीता खंडागळे, वृषाली चवळे, अरुणा बिरादार, रिया घाटोळ, अश्र्विनी कलमे, वर्षाराणी पाटील, यांना रोटरीची पिन देऊन सभासद करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.प्रा.अनिल चवळे यांनी तर आभार रो. सचिन करकनाळे यांनी मानले कार्यक्रमाची सुरुवात वृक्षास पाणी घालून तर राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार व मुलींच्या जन्माचे स्वागत करण्यासाठीची प्रतिज्ञा तसेच फक्त मुली असणाऱ्या रोटेरियनचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी डॉ. अशोक सांगवीकर, डॉ पांडुरंग कदम, डॉ चंद्रकांत उगिले, डॉ नंदकुमार गुणाले, डॉ सतीश पेड, डॉ निलेश मजगे, डॉ संगमेश्र्वर हेंगणे, ॲड भारत चामे, नरसिंग चिलकावार, महेंद्र खंडागळे, मोहिब कादरी, प्रा व.मा. माने, शिवाजी पाटील, नजीब पठाण, राजेंद्र कल्याणे, भरत ईगए, धनंजय कोत्तावार, गंगाधर याचवाड ,शरद जोशी, गोपाळ पटेल, प्रशांत घाटोळ, अनिल फुलारी, संतोष मद्देवाड, रवी पुणे, पांडुरंग पाटील, राहुल घाटोळ ,संजय गोटमवाड ,ज्ञानोबा भोसले, बालाजी पटवारी, दिलीप आरदवाड ,धोंडीराम ईरलापल्ले, मनोज आरदवाड, राजकुमार बिरादार, राजेश्र्वर पाटील तादलापूर, अशोक पाटील, राजेश्र्वर पाटील तोगरी, विलास ढगे, प्रभाकर सूर्यवंशी, शिवमुर्ती भातांबरे, भरत शिरूरकर यांचे सह रोटरी सभासद व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व रोटरी क्लब अहमदपूरच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

**CHANGE IN NAME**

I have change my name from **ASHA MAHADEV SHELAKE To ASHA MAHADEV SHELKE** Hence for this declaration in future.
**OLD NAME:-ASHA MAHADEV SHELAKE**
**NEW NAME:-ASHA MAHADEV SHELKE**
In future the same name will be used by my spouse and children
**Address: RING ROAD, MATAJI NAGAR, LATUR, LATUR, MAHARASHTRA, 413512**
**Aadhar No:- 205183769701**
**Mobile No:- 8847719716**

## आंध्र प्रदेशात उभारली जाणार श्रीरामचंद्रांची सर्वात उंच मुर्ती, होणार ३०० कोटी खर्च

मंत्रालयम : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी प्रभू रामाच्या सर्वात मोठ्या पुतळयाची पायाभरणी केली. कुरनूलजवळील नंदयाल जिल्ह्यातील मंत्रालयम येथे उभारण्यात येणारी ही मूर्ती देशातील सर्वात मोठी रामाची मूर्ती असेल. हा १०८ फूट लांबीचा पुतळा 'पंचधातू'पासून बनवला जाणार आहे. जय श्री राम फाऊंडेशनच्या वतीने तयार करण्यात येत असलेल्या या पुतळयाच्या उभारणीसाठी ३०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

श्री राघवेंद्र स्वामी मठाने भगवान रामाच्या या पुतळ्यासाठी १० एकर जमीन दान केली आहे, जेणेकरून या भूमीवर देशातील सर्वात मोठी रामाची मूर्ती उभारता येईल. हा पुतळा शिल्पकार राम वानजी सुतार बनवणार आहेत, ज्यांनी गुजरातमधील केवडिया येथे जगातील सर्वात मोठ्या पुतळ्याची रचना स्टॅच्यू ऑफ युनिटी केली आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी, जगातील सर्वात मोठा पुतळा, भारताचे स्वातंत्र्यसेनानी आणि देशाचे पहिले गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांचा पुतळा आहे. आता या मूर्तीची रचना करणारा शिल्पकारच रामाची सर्वात मोठी मूर्ती बनवणार आहे.

रविवारी गृहमंत्री अमित शहा यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमात भाग घेतला आणि राम पुतळ्याची पायाभरणी केली. राघवेंद्र स्वामी मठाचे पुजारी सुबेंद्र तीर्थ स्वामी आणि माजी राज्यसभा खासदार टीजी व्यंकटेश हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही याच क्षणी ट्विट केले आहे.

आंध्र प्रदेशातील कुरनूल येथील राघवेंद्र स्वामी मठात बांधण्यात येणाऱ्या भगवान रामाच्या १०८ फूट उंच पुतळ्याची पायाभरणी केल्याचे गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, प्रभू रामांचा हा विशाल पुतळा देशातील सर्वात मोठी राम मूर्ती असेल आणि त्यामुळे शहर भक्तीभावाने न्हाऊन निघेल. गृहमंत्री शाह यांनी ट्विट केले की हा पुतळा लोकांमध्ये आपली सभ्यता आणि मूल्यांप्रती बांधिलकीची भावना निर्माण करेल.

**जाहीर प्रगटन**

या प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, माझ्या पासपोर्टवर (Passport No. J6007794) माझे नाव **SAYED MUMTAJ AHMED** असे असून माझ्या इतर कागदपत्रांवर माझे नाव **SAYYED MUMTAZ AHMAD** असे आहे. या पुढील माझ्या खासगी व कायदेशीर व्यवहारात माझे हेच नवीन नाव **SAYYED MUMTAZ AHMAD** वापरात घेईन याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.
**OLD NAME : SAYED MUMTAJ AHMED**
**NEW NAME : SAYYED MUMTAZ AHMAD**
**ADDRESS : HUSAINIYA COLONY, INDIA NAGAR, LATUR - 413512 (M.S.)**

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **PETE MAHESH MADHAVRAO TO : PETHE MAHESH MADHAVRAO** HENCE FOR THIS DECLARATION. I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **PETHE MAHESH MADHAVRAO** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : -PETE MAHESH MADHAVRAO**
**NEW NAME : -PETHE MAHESH MADHAVRAO**
**ADDRESS :- DHANEGAV, TQ. & DIST. LATUR.**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **WASHISHTHA DNYANOBA CHOURE TO : VASHISTA DNYANOBA CHOURE** HENCE FOR THIS DECLARATION. I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **VASHISTA DNYANOBA CHOURE** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : - WASHISHTHA DNYANOBA CHOURE**
**NEW NAME : -VASHISTA DNYANOBA CHOURE**
**ADDRESS :- AMBAJOGAI ROAD LATUR.**

**Change Of Name**

To whomever it may concern, this is to declare that, in my old passport (Passport No. J6007794) by mistake my name was written as **SAYED MUMTAJ AHMED**. But my correct name is **SAYYED MUMTAZ AHMAD** and from now onwards I will use my correct name **SAYYED MUMTAZ AHMAD** Hence declared,kindly take a note.
**OLD NAME : SAYED MUMTAJ AHMED**
**NEW NAME : SAYYED MUMTAZ AHMAD**
**ADDRESS : HUSAINIYA COLONY, INDIA NAGAR, LATUR - 413512 (M.S.)**



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते